का प्र

भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी अधिनियम, १८८६

( १८८६ चा अधिनियम क्रमांक ६ )

[ १ ऑक्टोबर १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे ]

# The Births, Deaths and Marriages Registration Act, 1886

## (Act No. 6 of 1886)

[ As in force on 1st October 1977 ]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले.

१९७८

[ किंमत ५० पैसे ]

# जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी अधिनियम, १८८६

## (१८८६ चा अधिनियम क्रमांक ६)

### कलमांचा क्रम

### प्रकरण १ ले

### प्रारंभिक


कलमे

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.
२. स्थानिक विस्तार.
३. व्याख्या.
४. स्थानिक कायद्यांची व्यावृत्ती.
५. वेळोवेळी वापरावयाच्या शक्ती.


### प्रकरण २ रे

### जन्म, मृत्यू व विवाह यांची सर्वसाधारण नोंदणी कार्यालये


६. सर्वसाधारण नोंदणी कार्यालयांची स्थापना व महानिबंधकाची नियुक्ती.
७. सर्वसाधारण नोंदणी कार्यालयाने निर्देशिका ठेवावयाच्या.
८. निर्देशिका निरीक्षणार्थ खुल्या असावयाच्या.
९. नोंदींच्या नकला पुराव्यात स्वीकार्य.
१०. महानिबंधकाने निबंधकांवर देखरेख ठेवणे.


### प्रकरण ३ रे

### जन्म व मृत्यू यांची नोंदणी

#### क. या प्रकरणाची प्रयुक्ती


११. ज्यांचे जन्म व मृत्यू नोंदणीयोग्य आहेत अशा व्यक्ती.


#### ख. नोंदणी आस्थापना


१२. आपल्या राज्यक्षेत्रांकरिता निबंधकांची नियुक्ती करण्याची राज्य शासनाची शक्ती.
१३. [ निरसित ].
१४. निबंधक हा लोकसेवक मानावयाचा.
१५. [ निरसित ].
१६. निबंधकाचे कार्यालय व उपस्थिती.
१७. निबंधकाची अनुपस्थिती किंवा त्याचे रिक्त पद.
१८. नोंदवह्या पुरवावयाच्या व अभिलेखांचे जतन करण्याची व्यवस्था करावयाची.


#### ग. नोंदणीची पद्धती


१९. ज्यांच्या संबंधात नोटीस देण्यात आली असेल अशा जन्मांची व मृत्यूंची नोंदणी करण्याचे निबंधकाचे कर्तव्य.
२०. जन्माबद्दलची नोटीस देण्यास प्राधिकृत असलेल्या व्यक्ती.
२१. मृत्यूबद्दलची नोटीस देण्यास प्राधिकृत असलेल्या व्यक्ती.
२२. जन्माची किंवा मृत्यूची नोंद नोटीस देणाऱ्या व्यक्तीने स्वाक्षरित करावयाची.
२३. जन्म किंवा मृत्यू यांच्या नोंदणीचे प्रमाणपत्र देणे.
२४. नोंदवह्यातील नोंदींच्या प्रमाणित प्रती महानिबंधकास पाठविण्याचे निबंधकाचे कर्तव्य.
२५. शोध घेणे व नोंदवह्यांतील नोंदींच्या प्रती.
२६. विवक्षित जन्म व मृत्यू यांच्या नोंदणीकरिता अपवादात्मक उपबंध.


#### घ. खोट्या माहितीबद्दल दंड


२७. बुद्धिपुरस्सर खोटी माहिती देण्याबद्दल दंड.


#### ङ. चुकांची दुरुस्ती


२८. जन्मांच्या किंवा मृत्यूंच्या नोंदवहीतील नोंदींची दुरुस्ती.

## प्रकरण ४ थे

### विवाह अधिनियमांचे विशोधन

२९–३१. [ निरसित ].

## प्रकरण ५ वे

### विवक्षित विद्यमान नोंदवह्यांच्या संबंधात विशेष उपबंध

३२. विवक्षित अभिलेख ज्यांच्या अभिरक्षेमध्ये असतील त्यांना ते अभिलेख एका वर्षामध्ये महानिबंधकाकडे पाठवण्यास परवानगी.

३३. नोंदवह्यांची तपासणी करण्यासाठी आयुक्तांची नियुक्ती.

३४. आयुक्तांची कर्तव्ये.

३५. आयुक्तांनी तयार केलेल्या सूच्यांमध्ये शोध घेणे व नोंदींच्या प्रमाणित प्रती देणे.

३५क. या प्रकरणांच्या प्रयोजनार्थ जादा आयोगांची स्थापना.

## प्रकरण ६ वे

### नियम

३६. नियम.

३७. [ निरसित ].

# जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी अधिनियम, १८८६
## (१८८६ चा अधिनियम क्रमांक ६)[१]

[८ मार्च, १८८६]

विवक्षित जन्म व मृत्यू यांच्या ऐच्छिक नोंदणीबाबत, विवक्षित जन्म, मृत्यू व विवाह यांच्या नोंदवह्या ठेवण्यासाठी सर्वसाधारण नोंदणी कार्यालये स्थापन करण्याबाबत व अन्य विवक्षित प्रयोजनांबाबत उपबंध करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी विवक्षित व्यक्तिवर्गांमधील जन्म व मृत्यू यांच्या ऐच्छिक नोंदणीसाठी, त्या जन्मांची व मृत्यूंची आणि १८७२ चा अधिनियम ३रा[२] किंवा 'भारतीय ख्रिस्ती विवाह अधिनियम, १८७२' (१८७२ चा १५) व 'पारशी विवाह व घटस्फोट अधिनियम, १९३६' (१९३६ चा ३) यांखाली नोंदवलेल्या विवक्षित विवाहांची नोंदणी अधिक परिणामकारक करण्यासाठी आणि ते जन्म, मृत्यू व विवाह यांच्या नोंदवह्या ठेवण्याकरिता सर्व-साधारण नोंदणी कार्यालये स्थापन करण्यासाठी उपबंध करणे समयोचित आहे;

आणि ज्याअर्थी नोंदवह्या ज्या देशामध्ये ठेवण्यात आल्या असतील त्या देशाच्या कायद्याद्वारे विशेषेकरून व्यादिष्ट केलेल्या कर्तव्याच्या पालनार्थ आवश्यक असेल तेवढे सोडून एरव्ही, ठेवलेल्या विवक्षित विद्यमान नोंदवह्यांचे अधिप्रमाणन व अभिरक्षा यांच्याकरिता उपबंध करणे आणि त्या नोंदवह्यांतील नोंदींच्या नकला पुराव्या-मध्ये स्वीकार्य असतील हे घोषित करणे हेदेखील समयोचित आहे;

त्याअर्थी पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे:—

### प्रकरण १ ले

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास 'जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी अधिनियम, १८८६' असे म्हणता येईल; आणि

(२) [३][केंद्र शासन] [४][शासकीय राजपत्रातील] अधिसूचनेद्वारे निदेशित करील अशा दिनांकास[५] तो, अंमलात येईल.

[६]* * * * *

स्थानिक विस्तार.

[७][२. या अधिनियमाचा विस्तार[८] १ नोव्हेंबर १९५६ च्या लगतपूर्वी 'भाग ख' राज्यामध्ये समाविष्ट असलेली राज्यक्षेत्रे खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.]

व्याख्या.

३. या अधिनियमामध्ये विषय किंवा संदर्भ यात काही प्रतिकूल नसेल तर,—

"स्वाक्षरी" यामध्ये निशाणी करणारी व्यक्ती आपले नाव लिहिण्यास असमर्थ असेल तर निशाणीचा समावेश होतो:

"विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली [९]* * * * केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे: आणि

"निबंधक, जन्म व मृत्यू" याचा अर्थ, या अधिनियमाखाली नियुक्त केलेला निबंधक, जन्म व मृत्यू असा आहे.

स्थानिक कायद्यांची व्यावृत्ती.

४. अधिनियमातील किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, विशिष्ट स्थानिक क्षेत्रांमधील जन्म व मृत्यू यांच्या नोंदणीचा उपबंध करण्यासाठी यापूर्वी किंवा यानंतर पारित केलेल्या कोणत्याही कायद्यावर परिणाम होणार नाही.

वेळोवेळी वापरावया-च्या शक्ती.

५. या अधिनियमाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्ती प्रसंगानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे वेळोवेळी वापरता येतील.

---

[१] उद्देश व कारणे यांचे निवेदन याकरिता पहा: गॅझेट ऑफ इंडिया, १८८५, भाग पाच, पृष्ठ १२; प्रवर समितीच्या अहवालाकरिता पहा: गॅझेट ऑफ इंडिया, १८८६, भाग चार, पृष्ठ १०३; आणि परिषदेतील कामकाजाकरिता पहा: गॅझेट ऑफ इंडिया, १८८५, पुरवणी, पृष्ठे १४ व ८७ आणि गॅझेट ऑफ इंडिया, १८८६, पृष्ठ २९०.

[२] आता 'विशेष विवाह अधिनियम, १९५४' पहा.

[३] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिल" या शब्दांऐवजी घातले.

[४] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गॅझेट ऑफ इंडियामधील" या शब्दांऐवजी घातले.

[५] १ ऑक्टोबर १८८८, पहा: गॅझेट ऑफ इंडिया, १८८८, भाग एक, पृष्ठ ३३६.

[६] १८९१ चा १२ या विशोधन अधिनियमाद्वारे पोट-कलम (३) निरसित.

[७] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ कलमाऐवजी घातले.

[८] 'संथाळ परगणा धाराबंदी विनियम' (१८७२ चा ३), कलम ३ द्वारे तो संथाळ परगण्यात अंमलात असल्याचे घोषित करण्यात आले आहे. 'वऱ्हाड विधि अधिनियम, १९४१' (१९४१ चा ४) याद्वारे तो वऱ्हाडवरही अंशतः विस्तारित करण्यात आला आहे.

[९] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलने" हे शब्द गाळले.

(शा.म.मु.) म-अ एच ४८४३—२ (१०५५—५-७८)

## प्रकरण २ रे

### जन्म, मृत्यू व विवाह यांची सर्वसाधारण नोंदणी कार्यालये

सर्वसाधारण नोंदणी कार्यालयांची स्थापना व महानिबंधकाची नियुक्ती.

६. प्रत्येक [1][राज्य शासन]—

(क) या अधिनियमाखाली नोंदलेले जन्म व मृत्यू किंवा (विवक्षित प्रकरणी विवाह पद्धतीबाबत उपबंध करण्यासाठी) १८७२ चा अधिनियम तीन[2] अथवा 'भारतीय ख्रिस्ती विवाह अधिनियम, १८७२' (१८७२ चा १५) याखाली किंवा मुंबई उच्च न्यायालयाच्या साधारण मूळ दिवाणी अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या पलिकडे 'पारशी विवाह व घटस्फोट अधिनियम, १९३६' (१९३६ चा ३) याखाली नोंदलेले विवाह यांच्या नोंदवह्यांच्या ज्या प्रमाणित प्रती या अधिनियमाखाली किंवा या अधिनियमाद्वारे विशोधित केलेल्या अशा लगतपूर्वी निर्दिष्ट केलेल्या तीन अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमाखाली त्याच्याकडे पाठवण्यात येतील त्या प्रमाणित प्रती ठेवण्यासाठी सर्वसाधारण नोंदणी कार्यालय स्थापन करील ; आणि

(ख) त्या कार्यालयाच्या प्रशासनाखालील क्षेत्रांकरिता, महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह या पदनामाच्या अधिकाऱ्याची त्या कार्यालयाचा प्रभारी म्हणून नियुक्ती करू शकेल.

[3]* * * * *

सर्वसाधारण नोंदणी कार्यालयाने निर्देशिका ठेवावयाच्या.

७. प्रत्येक महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह हा, या अधिनियमाखाली किंवा १८७२ चा अधिनियम तीन[2] याखाली, 'भारतीय ख्रिस्ती विवाह अधिनियम, १८७२' (१९७२ चा १५) किंवा या अधिनियमाद्वारे विशोधित केलेला असा 'पारशी विवाह व घटस्फोट अधिनियम, १९३६' (१९३६ चा ३) याखाली त्याच्या कार्यालयाकडे पाठवण्यात आलेल्या नोंदवह्यांच्या सर्व प्रमाणित प्रतींच्या निर्देशिका विहित नमुन्यामध्ये तयार करण्याची व त्या आपल्या कार्यालयामध्ये ठेवण्याची व्यवस्था करील.

निर्देशिका निरीक्षणार्थ खुल्या असावयाच्या.

८. विहित फी भरण्याच्या शर्तीवर, अशा प्रकारे तयार केलेल्या निर्देशिका, त्यांचे निरीक्षण करण्यासाठी अर्ज करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस निरीक्षणासाठी सर्व वाजवी वेळी खुल्या असतील, आणि निर्देशिका ज्या नोंदवह्यांशी संबंधित असतील त्या नोंदवह्यांच्या प्रमाणित प्रतींमध्ये केलेल्या नोंदींच्या नकला त्यांच्यासाठी अर्ज करणाऱ्या सर्व व्यक्तींना देण्यात येतील.

नोंदींच्या नकला पुराव्यात स्वीकार्य.

९. लगतपूर्व कलमाखाली दिलेली नोंदीची नकल महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह याच्याकडून अथवा [1][राज्य शासनाने] या बाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून प्रमाणित करण्यात येईल, आणि ज्याच्याशी ती नोंद संबंधित असेल तो जन्म, मृत्यू किंवा विवाह शाबीत करण्याच्या प्रयोजनार्थ ती पुराव्यात स्वीकार्य असेल.

महानिबंधकाने निबंधकांवर देखरेख ठेवणे.

१०. प्रत्येक महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह हा ज्या क्षेत्रांकरिता त्याची नियुक्ती झाली असेल त्या क्षेत्रांमधील निबंधक, जन्म व मृत्यू यांच्यावर सर्वसाधारण देखरेख ठेवील.

---

[1] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतीय सरकार" च्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घातला.
[2] आता "विशेष विवाह अधिनियम, १९५४" पहा.
[3] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे पोट-कलम (२) निरसित.

## प्रकरण ३ रे

### जन्म व मृत्यू यांची नोंदणी

### क. या प्रकरणाची प्रयुक्ती

ज्यांचे जन्म व मृत्यू नोंदणीयोग्य आहेत अशा व्यक्ती.

११. (१) ज्या व्यक्तींचे जन्म व मृत्यू प्रथमतः या प्रकरणाखाली नोंदणीयोग्य असतील अशा व्यक्ती पुढीलप्रमाणे आहेत, त्या अशा :—

(क) [1][हा अधिनियम ज्या राज्यक्षेत्रांवर विस्तारित आहे त्या राज्यक्षेत्रांत], [2]'भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १८६५' (१८६५ चा १०) ज्यांना लागू होतो आणि ज्यांच्या बाबतीत त्या अधिनियमाच्या कलम ३३२ खालील आदेश त्या त्या काळी अंमलात नसेल अशा वंशातील, पंथातील किंवा वन्यजमातीतील व्यक्ती आणि ख्रिस्ती धर्म प्रतिज्ञापित करणाऱ्या सर्व व्यक्ती ;

(ख) [निरसित.] विधि अनुकलन आदेश, १९५० द्वारे निरसित.

(२) परंतु, [3][राज्य शासन] शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे [4]* * * सर्वसाधारणपणे किंवा कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील अन्य कोणत्याही व्यक्तिवर्गाला हे प्रकरण लागू करून त्याच्या प्रवर्तनाची कक्षा विस्तारित करू शकेल.

### ख. नोंदणी आस्थापना

आपल्या राज्यक्षेत्रांकरिता निबंधकांची नियुक्ती करण्याची राज्य शासनाची शक्ती.

१२. [3][राज्य शासनास] आपल्या प्रशासनाखालील राज्यक्षेत्रांमधील ते निश्चित करील अशा स्थानिक क्षेत्रांकरिता आणि त्यास योग्य वाटेल तर त्या राज्यक्षेत्रांमधील कोणत्याही व्यक्तिवर्गाकरता निबंधक, जन्म व मृत्यू म्हणून, आपणास आवश्यक वाटतील तितक्या व्यक्तींची नावानिशी किंवा त्यांच्या पदीय नात्याने नियुक्ती करता येईल.

१३. [4][भारतीय संस्थानांकरिता निबंधकांची नियुक्ती करण्याची केंद्र शासनाची शक्ती.] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे निरसित.

निबंधक हा लोकसेवक मानावयाचा.

१४. प्रत्येक निबंधक, जन्म व मृत्यू हा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यात अभिप्रेत असल्याप्रमाणे लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

१५. [5][निबंधकांना काढून टाकण्याची शक्ती.] भारत शासन (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७ द्वारे निरसित.

निबंधकाचे कार्यालय व उपस्थिती.

१६. (१) निबंधक, जन्म व मृत्यू या पदावर असलेल्या प्रत्येक व्यक्तीची ज्या स्थानिक क्षेत्राकरिता किंवा राज्यक्षेत्रांच्या अगर डोमिनिअन्सच्या ज्या भागाकरिता नियुक्ती करण्यात आली असेल त्या क्षेत्रात किंवा भागात तिचे एकेक कार्यालय असेल.

(२) हे पोट-कलम ज्याच्या बाबतीत लागू असल्याचे [6][राज्य शासन] निदेशित करील असा प्रत्येक निबंधक, जन्म व मृत्यू हा महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह यांच्याकडून निदेशित करण्यात येईल अशा दिवशी व अशा वेळेत जन्म व मृत्यू यांची नोंदणी करण्याच्या प्रयोजनार्थ आपापल्या कार्यालयात उपस्थित राहील आणि आपल्या कार्यालयाच्या किंवा बाहेरच्या दरवाजावर किंवा त्याच्या आसपास ठळक जागी, आपले नाव व त्याचप्रमाणे ज्या क्षेत्राकरिता किंवा वर्गाकरिता त्याची या पदावर नियुक्ती झाली असेल त्याचा निबंधक, जन्म व मृत्यू म्हणून पदनाम [आणि कार्यालयात उपस्थित राहण्याचे आपले दिवस व वेळा हा तपशील नमूद करवील.

---

[1] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांत" याऐवजी घातले.

[2] आता 'भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५' (१९२५ चा ३९), कलम ३ पहा.

[3] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतीय सरकार" च्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घातला.

[4] प्रक्रांति अधिनियम, १९२० (१९२० चा ३८), कलम २ व १ ली अनुसूची याद्वारे "गव्हर्नर जनरल इन कौन्सिल यांच्या पूर्वमान्यतेने" हे शब्द वगळण्यात आले.

[5] या कलमाखाली नियुक्त केलेल्या निबंधकांप्रमाणे, आता विविध स्थानिक नियम आणि आदेश आणि सर्वसाधारण नियम आणि आदेश, खंड २, पृष्ठ ५५९ पहा.

[6] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतीय सरकार" च्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घातला.

निबंधकाची अनुपस्थिती किंवा त्याचे रिक्त पद.

१७. (१) कलकत्ता, मद्रास किंवा मुंबई या नगरांमधील स्थानिक क्षेत्राचा निबंधक, जन्म व मृत्यू सोडून अन्य अशा ज्या निबंधकाला हे कलम लागू [1] असल्याचे [2] [राज्य शासन] निदेशित करील असा कोणताही निबंधक अनुपस्थित असेल किंवा त्याचे पद तात्पुरते रिक्त असेल तेव्हा, महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह यांच्याकडून नियुक्त करण्यात येईल अशी कोणतीही व्यक्ती किंवा अशी नियुक्ती करण्यात आली नाही तर, निबंधकाचे कार्यालय ज्याच्या अधिकारितेत असेल असा जिल्हा न्यायालयाचा न्यायाधीश किंवा [2] [राज्य शासन] या बाबतीत नियुक्त करील असा अन्य अधिकारी, अशा अनुपस्थितीच्या काळात किंवा [2] [राज्य शासनाकडून] ते रिक्त पद भरण्यात येईपर्यंत निबंधक, जन्म व मृत्यू या पदावर राहील.

(२) कलकत्ता व मद्रास किंवा मुंबई या नगरांतील स्थानिक क्षेत्राचा असा कोणताही निबंधक, जन्म व मृत्यू हा अनुपस्थित असेल किंवा त्याचे पद तात्पुरते रिक्त असेल तेव्हा महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह याच्याकडून नियुक्त करण्यात येईल अशी कोणतीही व्यक्ती अशा अनुपस्थितीच्या काळात किंवा [2] [राज्य शासनाकडून] ते रिक्त पद भरण्यात येईपर्यंत निबंधक, जन्म व मृत्यू या पदावर राहील.

(३) महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह हा आपण या कलमाखाली केलेल्या सर्व नियुक्त्यांचे वृत्त [2] [राज्य शासनाला] कळवील.

नोंदवह्या पुरवावयाच्या व अभिलेखांचे जतन करण्याची व्यवस्था करावयाची.

१८. राज्य शासन हे, निबंधक, जन्म व मृत्यू या पदावर असलेल्या प्रत्येक व्यक्तीला पुरेशा जन्म नोंदवह्या आणि मृत्यू नोंदवह्या पुरवील, आणि जन्म व मृत्यू याच्या नोंदणीसंबंधीच्या अभिलेखांचे जतन करण्याकरता योग्य ती व्यवस्था करील.

## ग. नोंदणीची पद्धती

ज्यांच्या संबंधात नोटीस देण्यात आली असेल अशा जन्मांची व मृत्यूंची नोंदणी करण्याचे निबंधकाचे कर्तव्य.

१९. ज्यासाठी आपली नियुक्ती करण्यात आली असेल अशा स्थानिक क्षेत्रातील किंवा अशा वर्गातील जन्माबद्दलची किंवा मृत्यूबद्दलची नोटीस मिळाल्यानंतर प्रत्येक निबंधक, जन्म व मृत्यू हा जर नोटीस देण्यास या अधिनियमाद्वारे प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीने विहित मुदतीत व विहित पद्धतीने ती दिलेली असेल तर, ताबडतोब त्या जन्माची किंवा मृत्यूची नोंद योग्य त्या नोंदवहीमध्ये करील :

परंतु,—

(क) नोटीस एखाद्या बाबतीत खोटी असल्याचे समजण्यास त्यास कारण असेल तर, नोंद करण्याचा निदेश देणारा किंवा नोंद कोणत्या पद्धतीने करावयाची ते विहित करणारा आदेश त्याला, जिल्हा न्यायालयाच्या न्यायाधीशाकडून मिळेपर्यंत तो जन्माची किंवा मृत्यूची नोंद करण्यास नकार देऊ शकेल ; आणि

(ख) अनौरस बालकाचा पिता म्हणून एखाद्या व्यक्तीच्या नावाची नोंद करण्याबाबत मातेने आणि त्या बालकाचा पिता म्हणून अभिस्वीकार करणाऱ्या व्यक्तीने विनंती केल्याखेरीज तो त्या व्यक्तीचे नाव नोंदवहीत नोंदणार नाही.

जन्माबद्दलची नोटीस देण्यास प्राधिकृत असलेल्या व्यक्ती.

२०. पुढीलपैकी कोणतीही व्यक्ती जन्माबद्दलची नोटीस देऊ शकेल, त्या व्यक्ती अशा :—

(क) बालकाचा पिता किंवा माता ;

(ख) जन्माच्या वेळी उपस्थित असलेली कोणतीही व्यक्ती ;

(ग) ज्या घरात बालकाचा जन्म झाला असेल त्या घराचा कोणताही भाग बालकाच्या जन्माच्या वेळी स्वतःच्या ताब्यात असून जिला घरामध्ये बालकाचा जन्म झालेला आहे हे माहीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ;

(घ) जन्मानंतरची उपचारव्यवस्था सांभाळणारा आणि जन्म झालेला आहे यासंबंधी प्रत्यक्ष माहिती असलेला कोणताही वैद्यक व्यवसायी ;

(ङ) बालकाचा जिच्याकडे ताबा असेल अशी कोणतीही व्यक्ती.

मृत्यूबद्दलची नोटीस देण्यास प्राधिकृत असलेल्या व्यक्ती.

२१. पुढीलपैकी कोणतीही व्यक्ती मृत्यूबद्दलची नोटीस देऊ शकेल :—

(क) मृत्यूच्या संबंधात नोंदावयाचा आवश्यक तो कोणताही तपशील माहीत असलेला, मृताचा कोणताही नातेवाईक ;

(ख) मृत्यूच्या वेळी उपस्थित असलेली कोणतीही व्यक्ती ;

(ग) ज्या घरात मृत्यू झाला असेल त्या घराचा कोणताही भाग मयताच्या मृत्यूच्या वेळी स्वतःच्या ताब्यात असून जिला घरामध्ये मयताचा मृत्यू घडून आला आहे हे माहीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ;

(घ) मृताच्या शेवटच्या आजारपणामध्ये देखभाल करणारी कोणतीही व्यक्ती ;

(ङ) मृत्यूनंतर मयताचे प्रेत जिने पाहिले असेल अशी कोणतीही व्यक्ती.

---

[1] मद्रास शासनाने हे कलम, त्या शासनाने नियुक्त केलेल्या सर्व निबंधकांना कलम १२ खाली लागू असल्याचे जाहीर केले आहे, मद्रास नियम आणि आदेश पहा.

[2] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतीय सरकार" च्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घातला.

२२. (१) कलम १९ खाली निबंधक, जन्म व मृत्यू याने जन्माची किंवा मृत्यूची नोंद केलेली असेल तेव्हा, जन्माबद्दलची किंवा मृत्यूबद्दलची नोटीस देणाऱ्या व्यक्तीने निबंधकाच्या समक्ष नोंदीवर स्वाक्षरी केली पाहिजे : जन्माची किंवा मृत्यची नोंद नोटीस देणाऱ्या व्यक्तीने स्वाक्षरित करावयाची.

[१][परंतु, नोटीस देणाऱ्या व्यक्तीने अशी नोटीस लेखी दिलेली असेल आणि [२][राज्य शासनाने] या बाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांनुसार आवश्यक असल्याप्रमाणे आपली ओळख पटवण्यासंबंधीचा पुरावा निबंधकाची खात्री होईल अशाप्रकारे तिने दिलेला असेल तर, तिने निबंधकाच्या समक्ष उपस्थित राहण्याची किंवा नोंद स्वाक्षरित करण्याची आवश्यकता असणार नाही.]

(२) नोंद अशा प्रकारे स्वाक्षरित होईपर्यंत [१][किंवा पोट-कलम (१) च्या परंतुकामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती पूर्ण होईपर्यंत] जन्माची किंवा मृत्यूची नोंदणी झाली असे मानण्यात येणार नाही.

(३) अनौरस बालकाच्या जन्माची नोंदणी करण्यात येत असून, माता व आपण त्या बालकाचा पिता असल्याचे अभिस्वीकृत करणारी व्यक्ती यांनी मिळून, पिता म्हणून त्या व्यक्तीची नोंद करण्यात यावी अशी विनंती केली तर, मातेने व त्या व्यक्तीने निबंधकाच्या समक्ष नोंदवहीतील नोंदीवर स्वाक्षरी केली पाहिजे.

२३. (१) कोणत्याही जन्माची किंवा मृत्यूची नोंदणी करण्याच्या वेळी, जन्माबद्दलची किंवा मृत्यूबद्दलची नोटीस देणाऱ्या व्यक्तीकडून अर्ज आल्यानंतर व तिच्याकडून विहित फी भरण्यात आल्यानंतर निबंधक, जन्म व मृत्यू हा जन्माची किंवा मृत्यूची नोंदणी केल्याबद्दल आपल्या सहीचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र अर्जदारास देईल. जन्म किंवा मृत्यू यांच्या नोंदणीचे प्रमाणपत्र देणे.

२४. (१) [३][हा अधिनियम ज्या राज्यक्षेत्रांवर विस्तारित असेल त्या राज्यक्षेत्रांमधील] प्रत्येक निबंधक, जन्म व मृत्यू हा विहित कालांतरागणिक, त्याने ठेवलेल्या नोंदवहीमध्ये त्यामागील कालांतरांपैकी अखेरच्या कालांतरानंतर केलेल्या जन्म-मृत्यूच्या सर्व नोंदींची विहित नमुन्यातील त्याने प्रमाणित केलेली खरी प्रत ज्याकरिता आपली नियुक्ती झाली आहे ते स्थानिक क्षेत्र ज्या ठिकाणी वसलेले असेल किंवा त्या वर्गातील लोक जेथे राहात असतील अशा राज्यक्षेत्रांचा महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह याच्याकडे पाठवील : नोंदवह्यांतील] नोंदीच्या प्रमाणित प्रती महानिबंधकास पाठविण्याचे निबंधकाचे कर्तव्य.

परंतु, चर्च ऑफ इंग्लंड, चर्च ऑफ रोम आणि चर्च ऑफ स्कॉटलंड यांचे क्लर्जीमेन असलेले निबंधक, जन्म व मृत्यू यांच्या बाबतीत निबंधक, त्याच्या धर्मकार्य वरिष्ठांकडून तसा निदेश देण्यात आला असेल तर प्रथमतः त्या प्रमाणित प्रती त्या धर्मकार्य वरिष्ठाकडे पाठवू शकेल व तो वरिष्ठ त्या प्रती योग्य तो महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह याच्याकडे पाठवील.

या पोट-कलमात, "चर्च ऑफ इंग्लंड" व "चर्च ऑफ स्कॉटलंड" याचा अर्थ कायद्यानुसार स्थापन करण्यात आलेले अनुक्रमे चर्च ऑफ इंग्लंड आणि चर्च ऑफ स्कॉटलंड असा आहे आणि "चर्च ऑफ रोम" याचा अर्थ रोमच्या पोपला धर्मप्रमुख मानणारे चर्च असा आहे.

(२) [निरसित.] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे निरसित.

[४]* * * * * * *

२५. (१) प्रत्येक निबंधक, जन्म व मृत्यू हा विहित फी भरण्यात आल्यानंतर सर्व वाजवी वेळांमध्ये, त्याने ठेवलेल्या नोंदवह्यांमध्ये शोध घेण्याची परवानगी देईल, आणि त्यामधील कोणत्याही नोंदीची प्रत देईल. शोध घेणे व नोंदवह्यांतील नोंदींच्या प्रती.

(२) या कलमाखाली दिलेली नोंदवहीतील कोणत्याही नोंदीची प्रत्येक प्रत निबंधक, जन्म व मृत्यू याच्याकडून प्रमाणित करण्यात येईल आणि ती ज्या जन्माशी किंवा मृत्यूशी संबंधित असेल तो शाबीत करण्याच्या प्रयोजनार्थ पुराव्यात स्वीकार्य असेल.

२६. कलम १९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, [२][राज्य शासन] नियम [५] करून निबंधक, जन्म व मृत्यू यांना, ज्या स्थानिक क्षेत्रांकरिता किंवा ज्या वर्गांकरिता त्यांची नियुक्ती करण्यात आली असेल त्यांच्याबाहेर होणाऱ्या जन्मांची किंवा मृत्यूंची नोंद करण्यासाठी त्या नियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात यावयाच्या अशा शर्तींवर व अशा परिस्थितींमध्ये त्या नियमांद्वारे प्राधिकृत करू शकेल. विवक्षित जन्म व मृत्यू यांच्या नोंदणीकरिता अपवादात्मक उपबंध.

---

[१] 'जन्म, मृत्यू आणि विवाह नोंदणी (विशोधन) अधिनियम, १९११' (१९११ चा ९), कलम २ द्वारे घातले.

[२] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतीय सरकार" च्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घातला.

[३] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतांमधील" या शब्दाऐवजी घातले.

[४] प्रक्रांति अधिनियम, १९२० (१९२० चा ३८) कलम २ व १ ली अनुसूची याद्वारे हे परंतुक घातले आणि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे निरसित केले.

[५] कलम २६ खाली, कलमे २८ आणि ३८ यांच्या खाली संयुक्तपणे केलेल्या नियमांकरिता पहा : सर्वसाधारण नियम आणि आदेश, खंड दोन, पृष्ठ ५६२ आणि विविध स्थानिक नियम आणि आदेश. गव्हर्नर जनरल इन कौन्सिल यांनी या अधिनियमाखाली १९११ पूर्वी केलेले सर्व नियम राज्य शासनांनी केले असल्याचे मानले जाईल, पहा : १९११ चा अधिनियम ९, कलम ६.

### घ. खोटया माहितीबद्दल दंड

बुद्धिपुरस्सर खोटी माहिती देण्याबद्दल दंड.

२७. जर कोणत्याही व्यक्तीने जन्माच्या किंवा मृत्यूच्या संबंधी या अधिनियमाखाली द्यावयाच्या कोणत्याही नोटिशीच्या संबंधात कोणतेही खोटे विधान ते जन्मांच्या किंवा मृत्यूंच्या कोणत्याही नोंदवहीत समाविष्ट व्हावे या हेतूने केले तर, तिला तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही शिक्षा होतील.

### ङ. चुकांची दुरुस्ती

जन्मांच्या किंवा मृत्यूंच्या नोंदवहीतील नोंदीची दुरुस्ती.

२८. (१) निबंधक, जन्म व मृत्यू याने या अधिनियमाखाली ठेवलेल्या कोणत्याही नोंदवहीतील कोणतीही जन्माची किंवा मृत्यूची नोंद, तिचे स्वरूप किंवा आशय यांच्या बाबतीत चुकीची असल्याची त्याची खात्री पटेल अशा प्रकारे शाबीत करण्यात आले तर, कोणत्या शर्तीवर व कोणत्या परिस्थितीत चुका दुरुस्त करता येतील त्यासंबंधात [1][राज्य शासनाकडून] करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने तो मूळ नोंदीमध्ये कोणताही फेरफार न करता समासामध्ये नोंद करून चुकीची दुरुस्ती करू शकेल आणि समासातील नोंदीवर सही करील आणि दुरुस्ती केल्याची तारीख नमूद करील.

(२) जर नोंदीची प्रमाणित प्रत महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह याच्याकडे अगोदरच पाठवण्यात आली असेल तर, निबंधक, जन्म व मृत्यू हा मुळातील चुकीच्या नोंदीची आणि त्या नोंदीच्या समासात केलेल्या दुरुस्तीची स्वतंत्र प्रमाणित प्रत तयार करून पाठवील.

---

[1] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतीय सरकार" च्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घातला..

## प्रकरण ४ थ

### विवाह अधिनियमांचे विशोधन

[कलमे २९ ते ३१]

निरसन अधिनियम, १९३८ (१९३८ चा १) कलम २ व अनुसूची याद्वारे निरसित.

---

## प्रकरण ५ वे

### विवक्षित विद्यमान नोंदवह्यांच्या संबंधात विशेष उपबंध

३२. [१][हा अधिनियम ज्या राज्यक्षेत्रांवर विस्तारित असेल त्या राज्यक्षेत्रांतील] कोणत्याही व्यक्तीच्या अभिरक्षेत कलम ११, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या वर्गांतील कोणत्याही व्यक्तींचा जन्म, बाप्तिस्मा, नामकरणविधी, समर्पणविधी, मृत्यू किंवा दफन यांची कोणतीही नोंदवही किंवा अभिलेख अथवा १८७२ चा अधिनियम ३ रा [२] किंवा 'भारतीय ख्रिस्ती विवाह अधिनियम, १८७२' (१८७२ चा १५) किंवा 'पारशी विवाह व घटस्फोट अधिनियम, १९३६' (१९३६ चा ३) ज्यांना लागू होतो अशा वर्गांतील कोणत्याही व्यक्तींच्या विवाहाची नोंदवही किंवा अभिलेख त्या त्या वेळी कोणत्याही व्यक्तीच्या अभिरक्षेत असेल, आणि अशी नोंदवही किंवा अभिलेख जेथे ठेवलेले असतील अशा देशाच्या कायद्याद्वारे विशेषेकरून व्यादिष्ट केलेल्या कर्तव्याचे अनुपालन म्हणून आवश्यक असेल त्याव्यतिरिक्त अन्यथा अशी नोंदवही किंवा अभिलेख तयार करण्यात आला असेल तर, ती व्यक्ती [३][१ एप्रिल १८९१ या दिवसापूर्वी केव्हाही] ती नोंदवही किंवा तो अभिलेख ज्या राज्यक्षेत्रात ती व्यक्ती राहते त्याचा महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह याच्या कार्यालयाकडे [४]* * * पाठवू शकेल ; विवक्षित अभिलेख ज्यांच्या अभिरक्षेमध्ये असतील त्यांना ते अभिलेख एका वर्षामध्ये महा-निबंधकाकडे पाठवण्यास परवानगी.

[४]* * * * * * *

३३. [५][(१) कोणतेही [६][राज्य शासन] त्याच्या प्रशासनाखालील राज्यक्षेत्रांच्या महानिबंधकाकडे कलम ३२ खाली पाठविण्यात आलेल्या नोंदवह्यांच्या किंवा अभिलेखांच्या बाबतीत, [७]* * * अशा नोंदवह्या किंवा अभिलेख यांच्या तपासणीसाठी आयुक्त म्हणून आपणास योग्य वाटेल एवढ्या व्यक्तींची नियुक्ती करू शकेल.] नोंदवह्यांची तपासणी करण्यासाठी आयुक्तांची नियुक्ती.

(२) अशा प्रकारे नियुक्त केलेले आयुक्त [६][राज्य शासनाकडून] नियुक्तीच्या आदेशाद्वारे किंवा त्यानंतरच्या कोणत्याही आदेशाद्वारे निर्देशित करण्यात येईल अशा मुदतीपर्यंत पद धारण करतील.

३४. (१) लगतपूर्व कलमाखाली नियुक्त केलेले आयुक्त, कलम ३२ खाली महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह यांच्याकडे पाठवण्यात येईल अशा प्रत्येक नोंदवहीची किंवा अभिलेखाची स्थिती, अभिरक्षा आणि त्याचा अस्सलपणा यासंबंधी चौकशी करतील आणि अशा सर्व नोंदवह्या किंवा अभिलेख यांची अथवा नोंदवह्यांचे किंवा अभिलेखांचे भाग यांची ते जितपत यथार्थ व विश्वासार्ह असतील त्याप्रमाणे वर्णनपर सूची किंवा वर्णनपर सूच्या महानिबंधकांकडे सुपूर्द करतील. आयुक्तांची कर्तव्ये.

(२) सूचीमध्ये किंवा सूच्यांमध्ये विहित तपशील असेल आणि नोंदवह्या किंवा अभिलेख किंवा नोंदवह्यांचे किंवा अभिलेखांचे भाग विहित रीतीने निर्दिष्ट करण्यात येतील.

(३) त्याचप्रमाणे आयुक्त, त्यांनी केलेली कोणतीही सूची किंवा सूच्या यांमध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे अशी कोणतीही नोंदवही किंवा अभिलेख, अथवा नोंदवहीचा किंवा अभिलेखाचा असा कोणताही भाग समाविष्ट असलेल्या प्रत्येक स्वतंत्र पुस्तकाच्या किंवा खंडाच्या एखाद्या भागावर ती नोंदवही, तो अभिलेख अथवा नोंदवह्यांचा किंवा अभिलेखांचा तो भाग उक्त सूचीत किंवा सूच्यांपैकी निर्दिष्ट केलेल्यांपैकी एक असल्याचे लेखी प्रमाणितही करतील.

---

[१] अनुकूलन आदेश, १९५६ द्वारे "भाग क राज्य किंवा भाग ग राज्य यामधील" या मजकुराऐवजी घातले.
[२] 'विशेष विवाह अधिनियम, १८७२' (१८७२ चा ३). आता 'विशेष विवाह अधिनियम, १९५४' (१९५४ चा ४३) पहा.
[३] 'जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी (विशोधन) अधिनियम, १८९०' (१८९० चा १६), कलम १ द्वारे "हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत" या मजकुराऐवजी घातले.
[४] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे विवक्षित शब्द व परंतुक गाळले.
[५] प्रक्रांति अधिनियम, १९२० (१९२० चा ३८) कलम २ व १ ली अनुसूची यांद्वारे मूळ पोट-कलम (१) ऐवजी घातले.
[६] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतीय सरकार" च्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घातला.
[७] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे विवक्षित शब्द निरसित केले.

आयुक्तांनी तयार केलेल्या सूच्यांमध्ये शोध घेणे व नोंदींच्या प्रमाणित प्रती देणे.

३५. (१) आयुक्तांनी महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह याच्याकडे सुपूर्द केलेली नोंदवही किंवा अभिलेख किंवा नोंदवह्यांचे अथवा अभिलेखांचे भाग यांची वर्णनपर सूची किंवा सूच्या त्या पाहण्याकरिता अर्ज करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला विहित फी भरण्याच्या शर्तीवर निरीक्षणार्थ खुल्या असतील आणि त्या नोंदवह्यांमधील किंवा अभिलेखांमधील नोंदींच्या प्रती त्यांच्यासाठी अर्ज करणाऱ्या सर्व व्यक्तींना देण्यात येतील.

(२) या कलमाखाली देण्यात आलेल्या नोंदींची प्रत महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह यांच्याकडून किंवा [1][राज्य शासनाने] या बाबतीत प्राधिकृत केलेला अधिकारी किंवा व्यक्ती याच्याकडून प्रमाणित करण्यात येईल, आणि ती नोंद ज्याच्याशी संबंधित असेल तो जन्म, बाप्तिस्मा, नामकरणविधी, समर्पण-विधी, मृत्यू, दफन किंवा विवाह शाबीत करण्याच्या प्रयोजनार्थ ती पुराव्यात स्वीकार्य असेल.

[2][या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ जादा आयोगांची स्थापना.

३५क. (१) [3]* * * राज्य शासन [4][शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे], कलम ३३ च्या प्रयोजनार्थ एकापेक्षा अधिक [5]आयोगांची नियुक्ती करू शकेल ; असा प्रत्येक आयोग अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील एवढे आणि असे सदस्य मिळून बनलेला असेल आणि कलम ३२ खाली महानिबंधकाकडे पाठवलेल्या नोंदवह्या व अभिलेख यांपैकी अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशांची या अधिनियमा-खाली किंवा तदन्वये केलेल्या नियमांखाली विल्हेवाट लावण्यापुरती त्याची कर्तव्ये मर्यादित असतील.

(२) पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून एकापेक्षा अधिक आयोगांची नियुक्ती करण्यात आल्यास या अधिनियमातील आयुक्तांचे उल्लेख हे अशा प्रकारे नियुक्त केलेल्या आयोगातील सदस्यांचे उल्लेख आहेत असा त्यांचा अर्थ लावण्यात येईल.]

---

[1] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतीय सरकार" च्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घातला.

[2] 'जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी अधिनियम, १८८६,' विशोधन अधिनियम, १८९० (१८९० चा १६), कलम २ द्वारे कलम ३५ क जादा दाखल केले, व नंतर प्रक्रांति अधिनियम, १९२० (१९२० चा ३८) कलम ३ आणि २ री अनुसूची याद्वारे निरसित केले. प्रक्रांति अधिनियम, १९२० (१९२० चा ३८) कलम २ व १ ली अनुसूची याद्वारे मूळच्या पोट-कलमाऐवजी आताचे पोट-कलम (१) घातले आणि निरसन आणि विशोधन अधिनियम, १९३४ (१९३४ चा २४) कलम २ आणि १ ली अनुसूची याद्वारे मूळच्या पोट-कलम (२) प्रमाणे असणारे पोट-कलम (२) घालण्यात आले.

[3] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "केंद्र शासन किंवा" हे शब्द निरसित केले.

[4] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "जर त्याला किंवा शासनाला योग्य वाटले तर गॅझेट ऑफ इंडियामधील किंवा, प्रकरणपरत्वे, स्थानिक शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे" याऐवजी घातले.

[5] या कलमाखाली नियुक्त केलेल्या आयोगांसाठी पहा : गॅझेट ऑफ इंडिया १८९०, भाग एक, पृ. ७४४.

## प्रकरण ६ वे

### नियम

[1][३६. [2][(१) प्रत्येक राज्याकरिता राज्य शासनाला [3]* * * * या अधिनियमाची उद्दिष्टे पार पाडण्यासाठी नियम करता येतील]. नियम.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे,—

(क) या अधिनियमाखाली द्याव्या लागणाऱ्या फीच्या रकमा निश्चित करता येतील ;

(ख) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असलेले नमुने विहित करता येतील ;

(ग) निबंधक, जन्म व मृत्यू याला जन्माबद्दलची किंवा मृत्यूबद्दलची नोटीस देण्यास या अधिनियमाखाली प्राधिकृत असलेल्या व्यक्तींनी किती मुदतीत व कोणत्या पद्धतीने ती नोटीस दिली पाहिजे ते विहित करता येईल;

(घ) जन्माबद्दलची किंवा मृत्यूबद्दलची नोटीस देणाऱ्या व्यक्तींनी निबंधक, जन्म व मृत्यू याच्यासमोर उपस्थित राहणे अनावश्यक करण्यात आले असेल तेव्हा, त्या व्यक्तींनी आपली ओळख पटवण्यासाठी निबंधकाकडे सादर करावयाचा पुरावा विहित करता येईल ;

(ङ) कोणत्या नोंदवह्या ठेवावयाच्या आणि निबंधक, जन्म व मृत्यू यांनी कोणत्या नमुन्यात व कशा रीतीने या अधिनियमाखाली जन्म-मृत्यूंची नोंदणी करावयाची आणि आपण ठेवलेल्या नोंदवह्यांतील जन्म-मृत्यूंच्या नोंदींच्या खऱ्या प्रती त्यांनी किती कालांतरागणिक महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह याच्याकडे पाठवावयाच्या ते विहित करता येईल ;

(च) निबंधक, जन्म व मृत्यू याला आपण ठेवलेल्या नोंदवह्यांमधील जन्म-मृत्यूंच्या नोंदी कोणत्या शर्तींवर व कोणत्या परिस्थितीत दुरुस्त करता येतील ते विहित करता येईल ;

(छ) ५ व्या प्रकरणाखाली नियुक्त केलेल्या आयुक्तांनी तयार केलेल्या वर्णनपर सूचीमध्ये किंवा सूच्यांमध्ये कोणता तपशील नमूद असावयास हवा आणि त्या सूच्या ज्यांच्याशी संबंधित असतील त्या नोंदवह्या किंवा ते अभिलेख अथवा नोंदवह्यांचे किंवा अभिलेखांचे ते भाग त्या सूच्यांमध्ये कशा रीतीने निर्दिष्ट करावयास हवेत ते विहित करता येईल ; आणि

(ज) त्या नोंदवह्या किंवा ते अभिलेख कशाप्रकारे अभिरक्षेत ठेवावयाचे ते विहित करता येईल.

(३) या अधिनियमाद्वारे प्रदान करण्यात आलेली नियम करण्याची प्रत्येक शक्ती ते नियम आधी प्रकाशित करून नंतर करण्यात आले पाहिजेत या शर्तीस अधीन आहे.

(४) या अधिनियमाखाली करण्यात आलेले सर्व नियम [4][शासकीय राजपत्रात] प्रकाशित करण्यात येतील आणि असे प्रकाशन झाल्यावर, ते जणू काही या अधिनियमातच अधिनियमित करण्यात आलेले असावेत त्याप्रमाणे परिणामक होतील.]

३७. [नियम करण्याची व प्रकाशित करण्याची कार्यपद्धती.] जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी (विशोधन) अधिनियम, १९११ (१९११ चा ९ वा)-क. ५ द्वारे निरसित.

---

[1] जन्म, मृत्यू आणि विवाह नोंदणी (विशोधन) अधिनियम, १९११ (१९११ चा ९)-कलम ४ द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी घातले.

[2] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी घातले.

[3] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "आणि भारतीय राज्यांमधील ब्रिटिश प्रजाजनांकरिता केंद्र सरकारला" हे शब्द निरसित केले.

[4] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "स्थानिक शासकीय राजपत्रात" याऐवजी घातले.

## THE BIRTHS, DEATHS AND MARRIAGES REGISTRATION ACT, 1886

### जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी अधिनियम, १८८६

#### इंग्रजी---मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| acknowledge | अभिस्वीकार करणे | [S.19-proviso-(b)] |
| baptism | बाप्तिस्मा | [S.32] |
| clergymen | क्लर्जीमेन | [S.24] |
| Commission | आयोग | [S.35 A] |
| Commissioner | आयुक्त | [S.34-m.n.] |
| dedication | समर्पणविधी | [S.32] |
| ecclesiastical superior | धर्मकार्य वरिष्ठ | [S.24] |
| form of marriage | विवाह-पद्धती | [S.6 (a)] |
| form or substance | स्वरूप किंवा आशय | [S.28] |
| General Registry Offices | सर्वसाधारण नोंदणी कार्यालये | [S.6-m.n.] |
| indexes | निदशिका | [S.7] |
| mark | निशाणी | [S.3] |
| naming | नामकरणविधी | [S.32] |
| personal knowledge | प्रत्यक्ष माहिती | [S.20 (d)] |
| Registrar General of Births, Deaths and Marriages | महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह | [S.10] |
| Registrar of Births and Deaths | निबंधक, जन्म व मृत्यू | [S.3] |
| sign | स्वाक्षरी करणे | [S.3] |
| spiritual head | धर्मप्रमुख | [S.24] |

### जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी अधिनियम, १८८६

## THE BIRTHS, DEATHS AND MARRIAGES REGISTRATION ACT, 1886.

#### मराठी---इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अभिस्वीकार करणे | acknowledge | [S.19-proviso-(b)] |
| आयुक्त | Commissioner | [S.34-m.n.] |
| आयोग | Commission | [S.35 A] |
| क्लर्जीमेन | clergymen | [S.24] |
| धर्मकार्य वरिष्ठ | ecclesiastical superior | [S.24] |
| धर्मप्रमुख | spiritual head | [S.24] |
| नामकरणविधी | naming | [S.32] |
| निबंधक, जन्म व मृत्यू | Registrar of Births and Deaths | [S.3] |
| निर्देशिका | indexes | [S.7] |
| निशाणी | mark | [S.3] |
| प्रत्यक्ष माहिती | personal knowledge | [S.20 (d)] |
| बाप्तिस्मा | baptism | [S.32] |
| महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह | Registrar General of Births, Deaths and Marriages | [S.10] |
| विवाह-पद्धती | form of marriage | [S.6 (a)] |
| समर्पणविधी | dedication | [S.32] |
| सर्वसाधारण नोंदणी कार्यालये | General Registry Offices | [S.6-m.n.] |
| स्वरूप किंवा आशय | form or substance | [S.28] |
| स्वाक्षरी करणे | sign | [S.3] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई